शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यू.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal)
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-नववे : जोडअंक-एकवीस आणि बावीस : जानेवारी ते जून २०२०

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

दिनांक १ व २ फेब्रुवारी, २०२०



## सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)
ता. कराड जि. सातारा
राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा)

* वारकरी संप्रदाय : प्रपंच व परमार्थ यांचा उत्तम समन्वय
डॉ.अशोक शिंदे १४०
* वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची प्रस्तुतता
डॉ. प्रदीप पाटील १४४
* श्रीविठ्ठल : समतेच्या परंपरेतील मिथक
डॉ. धोंडिराम दमामे १४८
* वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने स्थलपुराणांचे महत्त्व
प्रा. रेखा पसाले १५०
* वारकरी संप्रदायाची लोकाभिमुखता
प्रा. राजश्री बिसुरे १५३
* संत साहित्याचे सामाजिक संचित
विनायक राऊत १५६
* 'वारकरी संप्रदायाचा समन्वयवादी दृष्टिकोन'
डॉ. भीमराव वानोळे १६०
* संतसाहित्य आधुनिक काळास प्रेरणादायी - एक आढावा
प्रा. संतोषकुमार डफळापूरकर १६३
* संतसाहित्यातील दलितवेदनेचे अदिरुप
डॉ. वैशाली चौगुले १६७
* संत वाङ्मयातील नवविधा भक्तीचे आजच्या काळाच्या संदर्भातील औचित्य
डॉ. वर्षा फाटक १७०
* मध्ययुगीन वारकरी कीर्तनसंस्थेचा उदय व विकास
डॉ. दत्तात्रय डुंबरे, डॉ. सर्जेराव जिगे १७४
* वारकरी संप्रदाय: काळानुरूप बदलते कार्य
डॉ.सौ. कांचन नलवडे १७८
* वारकरी संप्रदाय आणि कीर्तन भक्तीचे फलित
प्रा. प्रमोद पाटील १८२
* भक्तिसंप्रदायातील भागवत धर्माने मराठी वाङ्मय समृद्ध करण्यामध्ये दिलेले योगदान
रोहिणी रेळेकर १८६
* संतसाहित्यावरील बौद्ध विचारांचा प्रभाव
डॉ. सुनीता कांबळे १९०
* Warkari Literature in Marathi
Dr. Ravindra Kulkarni १९४
* वारकरी संप्रदाय : संत ज्ञानेश्वरांच्या साहित्यातील मानवतावाद
डॉ. सविता व्हटकर १९९
* संत ज्ञानेश्वर : व्यक्तित्त्व आणि कवित्त्व
डॉ. शहाजी पाटील २०२
* ज्ञानेश्वरीतील लोकजीवनाच्या अनुषंगाने लोकशिक्षण
डॉ. सुहासकुमार बोबडे २०६

# वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची प्रस्तुतता

**प्रा. डॉ. प्रदीप पाटील**
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

## वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान व त्याची प्रस्तुतता

ज्ञानेश्वरांनी आपल्या ग्रंथनिर्मितीतून सांगितलेले, विशेषत: ज्ञानेश्वरीतून जीव, जगत आणि ईश्वर यांविषयी सांगितलेले तत्त्वज्ञान आणि सांगितलेला साधनमार्ग वारकरी संप्रदायास आधारभूत झाला आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरी हा ग्रंथ या संप्रदायात वेद मानला जातो. संत नामदेव यांची अभंगवाणी, एकनाथी भागवत आणि तुकारामांची अभंगगाथा यातून सुद्धा वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा विस्तार झालेला आहे.

वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा गाभा औपनिषदिक आहे. शास्त्रनिष्ठा आणि आत्मनिष्ठा या दोन्हींचा समन्वय त्यांच्या तत्त्वज्ञानात झालेला दिसून येतो. वारकरी संप्रदायाच्या तत्वज्ञानावर नाथ संप्रदायाच्या तत्त्वज्ञानातील अध्यात्म या घटकाचा प्रभाव असलेला दिसतो. तसेच शंकराचार्यांच्या अद्वैती तत्त्वज्ञानाचाही प्रभाव वारकरी संप्रदायावर असलेला दिसतो.

## अद्वैती तत्त्वज्ञान

शंकराचार्यांच्या अद्वैती तत्त्वज्ञानाचा स्वीकार वारकरी संप्रदायाने केलेला आहे. जीव, जगत आणि ईश्वर यांच्यामधील आभासीक आणि अज्ञानजन्य भेद ब्रह्मविद्येने नाहीसा करून चिन्मय परब्रह्माचे ज्ञान हाच अद्वैत सिद्धांत आहे. ज्ञानेश्वरांनी या अद्वैती सिद्धांताचे उपयोजन करून या सिद्धांताची उकल आपल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथातून केली आहे. विश्व हे अज्ञानी लोकांना परब्रह्मापेक्षा भिन्न, जड आणि विविध वाटू लागले, तेव्हा या अद्वैत ज्ञानाचा लोप होवू नये, म्हणून ज्ञानेश्वरांनी विश्व ब्रह्मचि केले म्हणजे हे विश्व चिन्मय ब्रह्मच आहे असे अद्वैत प्रस्थापित केले. ब्रह्मपेक्षा भिन्न अशा वेगळ्या विश्वाची स्थापना केली नाही. हे अद्वैत सिद्ध करताना नानाविधत्वावर मायिकतेचा आरोप करून त्याचा निरास केला आहे. परमेश्वर हा सृष्टीत वसलेला असून मानवाने सगळ्यांशी माणूसकीच्या नात्याने वागले पाहिजे, हे वारकरी संप्रदायाने सांगितलेले तत्त्वज्ञान आजही आवश्यक बनले आहे.

## शास्त्रनिष्ठा

वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा पाया शास्त्रनिष्ठा हा आहे. संस्कृतीच्या विकासामध्ये धर्म ही खूप महत्त्वाची बाब असून धर्माचा प्रचार व प्रसार हा शास्त्राच्या आधारेच होतो, अशी या संप्रदायाची धारणा आहे. अशा शास्त्रांना प्रमाण मानून शास्त्रांप्रती निष्ठा ठेवून शास्त्रांचा आचरणात समावेश असावा, असे वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान आहे. ज्ञानेश्वरांबरोबरच संत तुकाराम, संत रामदास आदि संतांनी सुद्धा शास्त्रनिष्ठा या घटकाचे महत्त्व आपआपल्या अभंगातून अधोरेखित केले आहे. वारकरी संप्रदायाने सांगितलेली ही शास्त्रनिष्ठा आजच्या वारकरी संप्रदायाच्या अनुयायांमध्ये असलेली दिसत नाही. धर्माच्या

नावाखाली आजसुद्धा अनेक कर्मकांड केले जाते. वारकरी संप्रदायाचा मूळ उद्देशच लोप पावत चालेला दिसतो. अशावेळी वारकरी संप्रदायातील अनुयायांना पुन्हा शास्त्रांकडे आणि त्यांच्या निष्ठेकडे वळविणे गरजेचे बनलेले आहे.

**आत्मनिष्ठा**

शास्त्रनिष्ठेबरोबरच वारकरी संप्रदायाने आत्मनिष्ठेलासुद्धा महत्त्वाचे स्थान दिले आहे. समाजातील प्रत्येक घटकाला व्यक्तिस्वातंत्र्य आहे. प्रत्येकजण आपल्या विचारानुसार जगू शकतो. त्याचबरोबर आपण कोणती विचारधारा मानायची, याचा सर्वस्वी निर्णय त्या व्यक्तीचाच असला पाहिजे, यावर वारकरी संप्रदाय ठाम असलेला दिसतो. प्रत्येकाला स्वतंत्र जगण्याचा अधिकार असून प्रत्येकाने आपली आत्मनिष्ठा सांभाळली पाहिजे, असे या संप्रदायाचे तत्वज्ञान आहे. आजच्या काळातील स्थितीचा विचार करता काही विचारसरणी ही लोकांच्या मनावर बिंबवली जाते. त्यासाठी सत्तेचा वापर राजरोजपणे सुरू असलेला दिसतो. त्यामुळे वारकरी संप्रदायाला अभिप्रेत असणारी आत्मनिष्ठा आठशे–नऊशे वर्षांनंतरही आज रुजण्यासाठी प्रयत्न करावा लागेल.

**चिद्‌विलासवाद**

वारकरी संप्रदाय चिद्‌विलासवादावर अधिक भर देणारा आहे. परमेश्वराची भक्ति करण्याचा प्रत्येकाला अधिकार असून ईश्वर भक्तांच्या बाबतीत कधीही दुजाभाव करीत नाही. परमेश्वराच्या भक्तीत सर्वांना समान न्याय असून परमेश्वर भक्तीतून आनंद मिळविला पाहिजे, परमेश्वर आपल्याला सर्व सुख देत असतो. या परमेश्वराच्या भक्तीत मोक्षप्राप्तीचा आनंद आहे, हा आनंद प्रत्येकाने मिळवावा, असे वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान आहे. परमात्माच विश्वरूपाने सर्वांना दिसत असतो, असे चिद्‌विलासवादाचे स्वरूप ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव या ग्रंथातून उलघडून दाखविले आहे. यालाच त्यांनी स्फूर्तीवाद किंवा मायावाद असे म्हणले आहे. वारकरी संप्रदायाचे हे तत्त्वज्ञान काही अंशी समाजात पाहावयास मिळते. वारकरी संप्रदायाचे चिद्‌विलासवाद हे तत्त्वज्ञान समाजात रुजले असले तरी अजूनही काही खेडेगावामधून याला छेद देणाऱ्या घडताना दिसतात, यावर विचार होणे गरजेचे आहे.

**कर्मयोग**

ज्ञानेश्वरांनी व नंतरच्या अनेक संतांनी आपल्या अभंगातून कर्मयोग सिद्धांत विशद केला आहे. वारकरी संप्रदायाच्या पुरस्कर्त्यांना समाजाविषयी अत्यंत कळवळा आहे. समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीयता, विषमता नष्ट झाली पाहिजे, धर्माची खरी शिकवण समाजाला व्हावी यासाठी ज्ञानेश्वरांनी सांगितलेला कर्मयोग वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानात अग्रस्थानी आहे. स्वर्गादी सुखाच्या अपेक्षेने यज्ञयाग, व्रतवैकल्ये व तीर्थयात्रा करणाऱ्या कर्मठांच्या आत्मज्ञानविरहित आंधळ्या कर्म आचरणांचा काही उपयोग नाही, असे वारकरी संप्रदायाचे म्हणणे आहे. कर्म हे शुद्ध, प्रामाणिक आणि निर्दोष असावे, असे ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे. कर्म कर्तृत्वाच्या अहंकाराचा आणि कर्म फळांच्या आसक्तीचा त्याग केलेले कर्म हेच निर्दोष कर्म होय. ज्ञानेश्वरांनी आत्मज्ञान विरहित कर्मांच्या आचारणाचा निषेध केला असून वर्णाश्रमविरहित कर्माच्या आचारणाचा पुरस्कार केला आहे. आजच्या काळात कर्म हे

स्वार्थ, पैसा, संपत्ती आणि मानापमान यात अडकून पडले आहे. सगळीकडे मी पणाची अहमअहिका सुरू असलेली दिसते. शुद्ध कर्म दिसेनासे झाले आहे. कोणतेही कर्म करीत असताना त्याच्या फळाची अपेक्षा पहिल्यांदा केली जाताना दिसते.

**नाममहात्म्य**

वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानात नाममहात्म्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नाममहिमा हा वारकरी संप्रदायातील वारकऱ्यांच्या भक्तीचा गाभा आहे. वारकरी संप्रदायातील प्रत्येक संत कवीने आपआपल्या अभंगातून नाममहात्म्य कथन केले आहे. परमेश्वराच्या नामस्मरणामुळे मोक्षप्राप्ती होते, सर्व संकटे नष्ट होतात, उत्तम आरोग्य लाभते, मन प्रसन्न होते अशी वारकरी संप्रदायाची धारणा आहे. याच नाममहात्म्यातून कीर्तन, भजन, प्रवचन, लोकनाट्य, सोंगी भजन यासारखे संस्कृतीचे घटक निर्माण झाले आहेत. नामसाधनाने परब्रह्माशी एकरूप होता येते. नाम हे देवांचे द्वार असून त्या द्वारी क्षणभर उभे राहिल्याने चारी मुक्ति साध्य होतात, असे वारकरी संप्रदायाचे म्हणणे आहे. याच नाममहात्म्यामुळे नामदेव, तुकाराम, गोरोबा कुंभार, सेना न्हावी यांचा अंतर्बाह्य बादल झाला. व ते परमेश्वराच्या चरणी लीन झाले. नामस्मरण ही एक मानसिक प्रक्रिया आहे, नामस्मरणामुळे मनावरील इतर विषयांचे संस्कार पुसून आत्म्याचे संस्कार दृढ होतात. याशिवाय दुसरे सोपे साधन नाही, असे वारकरी संप्रदाय मानतो.

**वेदनिष्ठा**

गीता, भागवत आणि उपनिषदे या परंपरेतून प्राप्त झालेले ज्ञान आत्मसात करून महाराष्ट्रात विकसित झालेला हा भागवत धर्म संतवाणीतून सातत्याने वेदनिष्ठा व्यक्त करीत आलेला आहे. ज्ञानेश्वरांपासून ते निळोबापर्यंत प्रत्येक संतांनी वेदनिष्ठा जपली असल्याचे दिसून येते. संत ज्ञानेश्वर आपली वेदनिष्ठा व्यक्त करताना म्हणतात,

या कारणे पै बापा जया आथी आपली कृपा
तेणे वेदांचीया निरोपा आण न किजे

अशा शब्दात वेदनिष्ठा व्यक्त केली आहे. ज्ञानेश्वरांनी आणि नामदेवांनी वेदांची प्रतिष्ठा वाढवून वर्णाश्रमाला बळकटी आणण्याचे काम केले आहे. एकनाथांची वेदनिष्ठा सामाजिक दृष्टीतून येते, तर नामदेवांची वेदनिष्ठा आध्यात्मिक पातळीवर उतरताना दिसते. संत तुकाराम या वेदनिष्ठेविषयी म्हणतात, वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा. भक्तियुक्त कर्माचरण करीत राहणे हेच वेदांचे सार तुकारामांना सांगावयाचे होते. आज वेदांचा अर्थ सोयीनुसार कमी-जास्त प्रमाणात घेतला जाताना दिसतो.

**आचारधर्म**

वारकरी संप्रदायातील आचारधर्म कोणा एका प्रवर्तकाने किंवा आचार्याने घालून दिलेले नाहीत. ते त्यांच्या तात्त्विक धरणेतून निर्माण झालेल्या नीतिशास्त्रानुसार स्वाभाविकपणे आकारास आलेले आहेत. त्यामुळेच त्यांच्या आचारास कर्मकांडाचे स्वरूप कधीच प्राप्त झालेले नाहीत. विठ्ठल हे वारकऱ्यांचे दैवत. विष्णुचेच ते एक रूप. यातूनच वारकरी संप्रदायात विश्वबंधुत्व, समत्व आणि प्रीति या तीन तत्वांचा समावेश झाला असून त्यातून त्यांचा आचारधर्म उदयास आला आहे. वारकरी संप्रदायातील लोक गळ्यात तुळशीमाळा

ISSN No. 2319-6025

परिधान करतात. संस्कृतीत तुळशीला पवित्र स्थान असून तुळशीच्या सानिध्यात आत्मशुद्धी होते, अशी धारणा वारकऱ्यांची आहे. तुळशीची माळ विठ्ठलास अत्यंत प्रिय आहे, ही माळ गळ्यात घातल्यानंतर सत्य बोलणे, पर स्त्री मातेसमान मानने, हिंसा न करणे, पंढरीची नित्यनेमाने वारी करणे, एकादशी व्रत स्वीकारणे, रोज राम कृष्ण हरी हा मंत्र जपणे इत्यादी नियमांचे पालन करण्यावर वारकरी संप्रदायाचा भर असलेला दिसतो. मुद्राधारण करणे म्हणजेच कपाळाला बुक्का लावणे, ही संप्रदायाची विशिष्ट खूण समजली जाते. त्यामुळे मनःस्वास्थ्य लाभते, अशी धारणा वारकरी संप्रदायात आहे. वारकरी संप्रदायाचा हा आचारधर्म आजही तंतोतंत पाळला जातो. परंतु यातील शुद्ध भाव कुठेतरी मागे पडलेला असून या आचारधर्माचे मर्म समजून घेणे आणि समजावून सांगणे गरजेचे बनलेले आहे.

**संदर्भ सूची**

१. तुळपुळे शं. गो.–संतवाणीतील पंथराज, मेहता प्रकाशन, पुणे, .
२. गोसावी र. रा.–पाच भक्तिसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
३. देशपांडे अ. ना.–प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, व्हीनस प्रकाशन, पुणे.
४. बहिरट भा. पं.–वारकरी संप्रदाय : उदय आणि विकास, व्हीनस प्रकाशन, पुणे.
५. दांडेकर शं. वा.–वारकरी संप्रदायाचा इतिहास, राजदीप प्रकाशन, मुंबई, .

* * * * * *